**सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कृषि समृध्दी योजनेंतर्गत मंजूर तरतूदीमधून सूक्ष्म सिंचन योजना, कृषि यांत्रिकीकरण योजना व मुख्यमंत्री कृषि अन्न प्रक्रिया योजना याअंतर्गत असलेले प्रलंबित दायित्व अदा करण्यासाठी रु.६००.०० कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक कृसयो-२०२६/प्र.क्र.१९५/का. ११ ए, ई. ऑ. क्र. १७७०२३५,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दि. १४ ऑगस्ट, २०२६.

**संदर्भ :-**

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रपीवियो-२०२५/प्र.क्र.६६/का.११ ए, दि.०९.०५.२०२५,
२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक कृसयो-२०२५/प्र.क्र.२१७/का.११ ए, दि.२२.०७.२०२५,
३) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक कृसयो-२०२५/प्र.क्र.३२१/का.११ ए, दि.०७.११.२०२५,
४) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. नियोजन/कृषि समृध्दी योजना/र -३२५/२०२६, दि.२४.०६.२०२६.

**प्रस्तावना :-**

राज्य मंत्रिमंडळाच्या दि.२९.०४.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत प्रचलित अनुदानाच्या मर्यादेत थेट लाभ हस्तांतरण (DBT) तत्त्वावर नवीन योजना राबविण्यास व त्यासाठी सन २०२५-२६ ते सन २०२९-३० या ५ वर्षांत दरवर्षी रु. ५,००० कोटी याप्रमाणे एकूण रु. २५,००० कोटींची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्या अनुषंगाने शासन निर्णय दि.०९.०५.२०२५ अन्वये "कृषि समृद्धी योजना" सुरू करण्यात आली असून, दि.२२.०७.२०२५ च्या शासन निर्णयाद्वारे योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचना विहित करण्यात आल्या आहेत.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कृषि समृद्धी योजनेच्या अंमलबजावणीसाठी रु. २,०००.०० कोटी इतकी अर्थसंकल्पित तरतूद करण्यात आली आहे. आयुक्त (कृषि) यांच्या दि. २४.०६.२०२६ च्या प्रस्तावास अनुसरून सूक्ष्म सिंचन, कृषि यांत्रिकीकरण आणि मुख्यमंत्री कृषि अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे प्रलंबित दायित्व अदा करण्यासाठी रु.६००.०० कोटी इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

कृषि समृद्धी योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतुदीमधून रु. ६००.०० कोटी (अक्षरी रुपये सहाशे कोटी फक्त) निधी खालील तक्त्यात दर्शविलेल्या घटकांसाठी व प्रयोजनासाठी वापरण्यास व वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | योजना | निधी (प्रलंबित दायित्व अदा करण्यासाठी) |
|---|---|---|
| १ | सूक्ष्म सिंचन (प्रति थेंब अधिक उत्पादन) | रु.१६०.०० कोटी |
| २ | कृषि यांत्रिकीकरण | रु.४२०.०० कोटी |
| ३ | मुख्यमंत्री कृषि अन्न प्रक्रिया योजना | रु.२०.०० कोटी |
| **एकूण** | | **रु.६००.००** कोटी |

२. वितरीत निधीच्या विनियोगासाठी अटी व शर्ती :-

(१) वितरित करण्यात आलेला वरील निधी त्या-त्या योजनांतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे केवळ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधार-संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात यावा.

(२) निधीचा वापर केवळ मंजूर प्रलंबित घटकांसाठीच, योजनांच्या विहित निकषांनुसार (सूक्ष्म सिंचन, कृषी यांत्रिकीकरण व अन्न प्रक्रिया) करण्यात यावा.

(३) आयुक्त (कृषि) यांनी सदर निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास विहित कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील.

३. प्रस्तुत खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा :-

**मागणी क्र. डी-३**
**२४०१, पीक संवर्धन**
**००, ११५, लहान/सीमान्त शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांची योजना**
**(००) (००) (०९) कृषि समृध्दी योजना**
**(१०० % राज्य योजना) (कार्यक्रम)**
**(२४०१ बी ६७१), ३३, अर्थसहाय्य**

४. सूक्ष्म सिंचन योजना (प्रति थेंब अधिक उत्पादन), कृषि यांत्रिकीकरण योजना व मुख्यमंत्री कृषि अन्न प्रक्रिया योजना या योजनांच्या प्रयोजनार्थ कृषि विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आलेले अधिकारी हे "नियंत्रक अधिकारी" आणि "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून काम पाहतील.

५. प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभागाने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौसं. क्रमांक ३४३/२०२६/व्यय-१, दि.०७.०८.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०२६०८१४१११२५३८२४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf Dept,
2.5.4.20=B693D975FFFC642FE6B87C2CE9E1297FD1E8BDA9B459F85F75F159984BA680FD, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.08.14 11:16:36 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई,
३) मा. उपमुख्यमंत्री {नगर विकास, गृह निर्माण आणि सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)} यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६) मा.मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
८) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
९) सर्व मा. विधानसभा / मा. विधानपरिषद सदस्य,
१०) मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय, मुंबई,
११) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१५) विभागीय आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर),
१६) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७) सर्व जिल्हाधिकारी,
१८) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२०) सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
२१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरिक्षा ), मुंबई/नागपूर,
२२) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई/नागपूर,
२३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२४) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२५) सह संचालक, लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
२६) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
२८) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२९) सर्व तालुका कृषि अधिकारी,
३०) निवडनस्ती, कार्यासन ११ ए.